# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०७ /२०२५ दि. ०८/०१/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०९/०१/२०२५ रोजी विविध पक्षांचे पदाधिकारी शिवसेना पक्षामध्ये प्रवेश करणर असुन पदाधिकारी व कार्यकर्ते हे मोठया प्रमाणात आनंद आश्रम, टेंभीनाका, ठाणे येथे एकत्र जमण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| प्रवेश बंद – | १) सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर व चरईकडून टेंभीनाका मार्गे टॉवरनाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्री भवानी चौक, टि.एम.सी. शाळा नं. १७, टेंभीनाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने टेंभीनाका येथून सरळ कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | २) टेंभीनाकाकडून कोर्टनाका सर्कल कडून व आंनद आश्रम मार्गे टॉवरनाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून डावे वळण घेऊन जांभळीनाका, मुख्य बाजारपेठ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | ३) ठाणे रेल्वे स्टेशनकडून टॉवरनाका/टेंभीनाकाकडे येणारी सर्व प्रकारच्या बसेस व एस. टी. बसेस तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने यांना **चिंतामणी चौक (टॉवरनाका )** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | ठाणे रेल्वे स्टेशनकडून सॅटिस ब्रिजवरुन येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस. टी बसेस तसेच टि. एम. टी. च्या सर्व बसेस हया बी कॅबिन सॅटिज ब्रिज वरुन गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने सॅटिज ब्रिज खालुन स्टेशन रोड आहिल्यादेवी पथ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| नो पार्कींग – | **टॉवरनाका ते टेंभीनाका, कोर्टनाका ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, श्रीभवानी चौक, टेंभीनाका ते ठाणे कोर्ट व कोर्ट परीसर** रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे. |

सदर अधिसूचना दिनांक ०९/०१/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० ते २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ /वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner